# जवाहरलाल नेहरू विद्यापीठ शिष्यवृत्ती

| अ क्र | योजना | योजनेचा तपशिल |
|---|---|---|
| १ | योजनेचे नाव | जवाहरलाल नेहरू विद्यापीठ शिष्यवृत्ती |
| २ | योजनेबद्दलचा शासन निर्णय | शासन निर्णय दिनांक 07.05.1983, दिनांक 05.02.2004 |
| ३ | योजनेचे स्वरूप | जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, नवी दिल्ली यांचे कडून विहित नियमानुसार त्या विद्यापीठात शिकत असलेल्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांमधून एका विद्यार्थ्याची सदर शिष्यवृत्ती साठी निवड केली जाते. जवाहरलाल नेहरु विद्यापीठाने निवड केल्यानुसार विद्यार्थ्यास महाराष्ट्र शासनाची मंजुरी घेतल्यानंतर सदर शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. |
| ४ | योजनेचा उद्देश | जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, नवी दिल्ली या विद्यापीठामध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी सहाय्य करणे. |
| ५ | योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव | सर्व प्रवर्गासाठी |
| ६ | योजनेच्या प्रमुख अटी | १. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.<br>२. जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, नवी दिल्ली यांचे कडून विहित नियमानुसार त्यांचे विद्यापीठात शिकत असलेल्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांमधून एका निवड केलेल्या विद्यार्थ्यास महाराष्ट्र शासनाची मंजुरी घेऊन सदर शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते.<br>३. संशोधन अभ्यासक्रमास जवाहरलाल नेहरू विद्यापीठ नवी दिल्ली येथे प्रवेश घेतलेले विद्यार्थी या योजनेसाठी पात्र आहेत.<br>४. नूतनीकरनासाठी जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, नवी दिल्ली यांचेकडील वार्षिक प्रगती अहवाल. |
| ७ | आवश्यक कागदपत्रे | 1. सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र<br>2. मागील वर्षाची गुणपत्रिका<br>3. नूतनीकरणासाठी जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, नवी दिल्ली यांचेकडील वार्षिक प्रगती अहवाल. |
| ८ | दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप | सदर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विद्यार्थास दरमहा रु. 8000/- व रु. 10000/- वार्षिक सादीलवार खर्च अशी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. |
| ९ | अर्ज करण्याची पध्दत | नवीन मंजूरीसाठी तसेच नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. |
| १० | ऑनलाईन अर्ज करण्याचे संकेतस्थळ | www.mahadbtmahait.gov.in |